Phone No:- 07232 242456 E-Mail :- vngmcytlstore@gmail.com

SHRI. VASANTRAO NAIK GOVT.MEDICAL COLLEGE&HOSPITAL,YAVATMAL

श्री.वसंतराव नाईक शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,यवतमाळ

No.SVNGMC&H/YTL/C.STORE/QUOTATION/10446 /2026 DT:-14 /08/2026

या संस्थेतील मेडीसीन विभागातील नादुरुस्त असलेल्या व्हेन्टीलेटर्सच्या दुरुस्तीकरीता आवश्यक असलेल्या सुटया भागांच्या खरेदी करीता जाहीर ई - दरपत्रके मागविण्याबाबत...

## जाहिर ई-दरपत्रक सुचना

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेतील औषधवैद्यकशास्त्र विभागातील अतिगंभीर रुग्णांच्या उपचारासाठी वापरण्यात येत असलेले काही व्हेन्टीलेटस हे मागील काही दिवसांपासून नादुरुस्त असल्याने याकरीता आवश्यक असणारे सुटया भागांची खरेदी व दुरुस्ती करण्यासाठी खालील तक्यात व्हेन्टीलेटर्स ला लागणारे सर्व आवश्यक पार्टच्या खरेदीकरीता पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता इच्छुक पुरवठादारांकडुन ई - दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

मोहरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतीम तारीखः-28 /०८/२०२६ दुंपारी ०५.०० वाजेपर्यंत असुन, सदर दरपत्रक हे दिनांकः-29/०८/२०२६ रोजी दिवशी दुपारी १२.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात खरेदी समितीच्या सभेमध्ये उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल. सदर दरपत्रक सादर करतांना इच्छुक पुरवठादारांनी खालील अटी व शर्तीनुसारच दरपत्रक सादर करावे.

१) दरपत्रक हे मा.अधिष्ठाता,श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ यांच्या नावे सादर करावयाचे आहे.

२) दरपत्रकाच्या लिफाप्यावर "Ventilator Repair Spare Part करीता जाहीर ई - दरपत्रके असे नमुद करावे.

३) दरपत्रक हे तांत्रिक लिफाफा (आवश्यक कागदपत्रे) व दराबाबतचा (सर्वकरांसहीत) लिफाफा असे दोन लिफाफे वेगवेगळे सादर करण्यात यावे. तांत्रिक लिफाफामध्ये संस्थेने मागीतलेली पुरवठादाराचे दुकान नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र, कॅन्सल चेक/बॅकेची डिटेल्स इतक्या दस्तऐवजांच्या साक्षांकीत छायांकीत प्रती या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच दराचा (सर्वकरांसहीत) लिफाफा संस्थेने मागीतलेल्या विहित नमुन्यातच पुरवठादाराने खालील नमूद बाबीचे किंमतीचे दर (सर्वकरांसहीत) नमुद असलेले विवरण पत्र सादर करण्यात यावे. दर हे हाताने लिहण्यात येवु नये, ते टंकलिखीत करुनच सादर करण्यात यावे.

४) पुरवठादाराने त्यांचे दर त्यांचे लेटरहेडवर संस्थेने दिलेल्या नमुन्यानुसार दिलेल्या क्रमाने देण्यात यावे.

५) जिथे दर द्यावयाचे नाही तिथे "इच्छुक नाही" असे स्पष्ट नमुद करावे.ती जागा रिकामी सोडण्यात येवु नये.

६) सर्व दर हे सर्व कर समाविष्ट करुनच नमुद करावे.

७) न्युनतम दर असणाऱ्या पुरवठादाराला पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर या संस्थेतील संबंधित विभागातील उपरोक्त यंत्राला आवश्यक असणा-या पार्टचा पुरवठा करुन सदरचे यंत्र त्वरीत दुरुस्त करावे, तसेच या कार्यालयाची तक्रार असल्यास ४८ तासांच्या आत बाधित सेवा तात्काळ सुरु करुन देण्याची जबाबदारी आपली राहील.

९) संबंधित पुरवठयाचे देयक हे मा.अधिष्ठाता यांचे नावे सेवा देण्यात आलेल्या विभागप्रमुखाकडुन प्रमाणित करुन चार प्रतित डिलीव्हरी नोट सहीत सादर करण्यात यावे. तदनंतर या कार्यालयास प्राप्त होणा-या/उपलब्ध निधीतून आपल्या देयकाची अदायगी या कार्यालयामार्फत करण्यात येईल.

अपुर्ण कागदपत्रासह/माहीतीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. आदेश/तक्रार प्राप्त होताच आदेशात नमूद सेवेचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
सदर दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाप्यामध्ये बंद करुन त्यावर या संस्थेतील Ventilator Repair Spare Part करीता जाहीर ई - दरपत्रके असे नमुद करावे.

(PTO)

Scanned with OKEN Scanner

सदरच्या लिफाफयावर पुरवठादाराने स्वतःचे नाव, संपुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमुद करावे व असा तयार केलेला लिफाफा या कार्यालयास विहीत मुदतीत आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करण्यात यावा तसेच संस्थेने सुचीत केलेल्या वेळे नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही. उपरोक्त यंत्रासाठी आवश्यक असणा-या स्पेअर पार्टचा तपशिल हा खालीलप्रमाणे आहे. सदरच्या यादीमध्ये ॲडल्ट व्हेन्टीलेटरला लागणारे सर्वच स्पेअर पार्टचे पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी न्युनतम दर मागविण्यात येत आहे, परंतु संबंधित विभागामध्ये व्हेन्टीलेटर दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्याच पार्टची खरेदी करुन व्हेन्टीलेटर दुरुस्त करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

| Sr No | Spare part name for Adult Ventilator | Rate with taxes |
|---|---|---|
| 1 | Flow Sensor | |
| 2 | O2 Sensor | |
| 3 | Power Supply Board | |
| 4 | Control Board | |
| 5 | Ventilator Display Board | |
| 6 | Expiratory Valve Assembly Board | |
| 7 | Mother Board | |
| 8 | Air O2 Mixture Module | |
| 9 | Air Filter | |
| 10 | Blower | |
| 11 | Ventilator Battery | |
| 12 | Compressor Board | |
| 13 | Inspiratory Block Assembly | |
| 14 | SMPS | |
| 15 | Gas Assembly | |
| 16 | Service Charges for Repair | |

[signature] 16/08/2024

अधिष्ठाता,

श्री.व.ना.शा.वै.महा.व रुग्णा.यवतमाळ

Scanned with OKEN Scanner